**प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत रब्बी हंगाम २०२२-२३ मधील उर्वरित राज्य हिस्सा विमा हप्ता अनुदानाकरिता रु.३६,९४,८६८/- इतकी रक्कम विमा कंपन्यांस अदा करण्यासाठी वितरीत करण्याबाबत..**

**महाराष्ट्र शासन**
**कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः प्रपिवियो-२०२५/प्र.क्र.१७४/११ अ,ई.ऑ.क्र.११७७७५९**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
दिनांक: ३० मार्च, २०२६.

**वाचा:-**

१) शासन निर्णय कृषि व पदुम विभाग क्र. प्रपिवियो-२०२२/प्र.क्र.७२/११- अ, दि.०१.०७.२०२२
२) शासन निर्णय कृषि व पदुम विभाग क्र. प्रपिवियो-२०२२/प्र.क्र.९३/११- अ, दि.०१.०३.२०२३
३) शासन निर्णय कृषि व पदुम विभाग क्र. प्रपिवियो-२०२२/प्र.क्र.९३/११- अ, दि.२६.०९.२०२३
४) वित्त विभाग, शासन परिपत्रक, क्र. अर्थसं-२०२५/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि.७.४.२०२५
५) विभागीय व्यवस्थापक, भारतीय कृषि विमा कंपनी यांचे पत्र क्र. AIC.MRO/PMFBY/RABI-२२ /७९१८/२५, दि.०५.०२.२०२६
६) संचालक(कृषि प्रक्रिया व नियोजन), कृषि आयुक्तालय, पुणे यांचे पत्र क्र.सां.८/वि.ह.अनु./रब्बी-२२-२३/र-१०६/२०२६, दि.१२.०२.२०२६

**प्रस्तावना :-**

राज्यात प्रधानमंत्री पीक विमा योजना खरीप हंगाम २०२२ व रब्बी हंगाम २०२२-२३ या कालावधीत दि.१.०७.२०२२ च्या शासन निर्णयान्वये भारतीय कृषि विमा कंपनी, आयसीआयसीआय लोंबार्ड जनरल इंशुरन्स कं.लि., बजाज अलियांझ जनरल इन्शुरन्स कंपनी, एचडीएफसी इर्गो जनरल इन्शुरन्स कंपनी व युनायटेड इंडिया इंन्शुरन्स कंपनी या ५ विमा कंपनींमार्फत राबविण्यात आली. भारतीय कृषि विमा कंपनी ही राज्यात  विमा कंपन्यांची समन्वयक कंपनी आहे. भारतीय कृषि विमा कंपनीने संदर्भ क्र. (५) अन्वये प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत रब्बी हंगाम २०२२-२३ मधील उर्वरित राज्य हिस्सा विमा हप्ता अनुदानाची मागणी केलेली आहे. त्यानुषंगाने संचालक (कृषि प्रक्रिया व नियोजन), कृषि आयुक्तालय, पुणे यांनी संदर्भ क्र. (६) अन्वये केलेल्या विनंतीस अनुसरून प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत रब्बी हंगाम २०२२-२३  मधील उर्वरित राज्य हिस्सा विमा हप्ता अनुदानाकरिता रक्कम रु.३६,९४,८६८/- इतका निधी विमा कंपन्यांस अदा करण्यासाठी प्रधानमंत्री पीक विमा योजनेच्या अंमलबजावणीकरिता आयुक्तालय स्तरावर उघडलेल्या ESCROW बँक खात्यामधील शिल्लक रकमेतून वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

भारतीय कृषि विमा कंपनीने सादर केलेली मागणी आणि कृषि आयुक्तालयाची शिफारस विचारात घेता प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत रब्बी हंगाम २०२२-२३ मधील उर्वरित राज्य हिस्सा विमा हप्ता अनुदानाकरिता रक्कम रु.३६,९४,८६८/- इतका निधी प्रधानमंत्री पीक विमा योजनेच्या अंमलबजावणीकरिता आयुक्तालय स्तरावर उघडलेल्या ESCROW बँक खात्यामधील शिल्लक रकमेतून संबंधित विमा कंपन्यांना खालीलप्रमाणे अदा करण्यासाठी भारतीय कृषि विमा कंपनीस उपलब्ध करून देण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे :-

**रब्बी हंगाम २०२२-२३ मधील उर्वरित राज्य हिस्सा अनुदान**

| अ.क्रं | कंपनीचे नांव | NCIP पोर्टलनुसार एकूण देय राज्य हिस्सा विमा हप्ता रक्कम (रु) | AIC कडील देयकानुसार एकूण देय राज्य हिस्सा विमा हप्ता रक्कम (रु) | विमा कंपन्यांना एकूण वितरीत राज्य हिस्सा अनुदान (रु) | AIC कडील देयकानुसार एकूण उर्वरीत देय राज्य हिस्सा अनुदान मागणी रक्कम (रु) | NCIP पोर्टलवरील आकडेवारीनुसार एकूण देय राज्य हिस्सा विमा हप्ता अनुदान रक्कम (रु) | सदर शासन निर्णयाद्वारे वितरीत करण्यात येणारी उर्वरीत देय राज्य हिस्सा रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | ICICI Lombard | १४२३७९७९८ | १४२३८००४१ | १४०३४०२८९ | **२०३९७५२** | **२०३९६०९** | **२०३९६०९** |
| २ | HDFC Ergo | २०२२९७४५३ | २०२२९७५८० | २००६४२१९४ | **१६५५३८६** | **१६५५२५९** | **१६५५२५९** |
| | **एकूण** | **३४४६७७३५१** | **३४४६७७६२१** | **३४०९८२४८३** | **३६९५१३८** | **३६९४८६८** | **३६९४८६८** |

२. सदरची रक्कम रब्बी हंगाम २०२२-२३ करीता वितरीत करण्यात येत असून त्याचा वापर यापुर्वीच्या इतर हंगामाकरीता अनुज्ञेय असणार नाही.

३. सदर शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात येणारा निधी प्रधानमंत्री पीक विमा योजनेच्या मार्गदर्शक सूचना व शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णयानुसारच खर्च करण्याची जबाबदारी आयुक्त (कृषि) यांची राहील.

४. प्रस्तुत प्रयोजनार्थ सहायक संचालक (लेखा), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी तर आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

५. प्रस्तुत शासन निर्णय वित्त विभाग अनौप. संदर्भ क्र.१९८/२०२५/व्यय-१, दि.२८.०३.२०२६ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. प्रस्तुत शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०३३०२०४२२१३२०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

PRATIBHA
MADHAV PATIL

Digitally signed by PRATIBHA MADHAV PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA,
ou=AGRICULTURE AND ADF DEPARTMENT,
2.5.4.20=b693d975fffc642fe6b87c2ce9e1297fd1e8bda9b459f85f75f159984ba680fd, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=DA026E85AE8CBB4E3C2ACDBECBBF2F6D6CB0AE6ED5C1E54483490119EE0456AD, cn=PRATIBHA MADHAV PATIL
Date: 2026.03.30 20:42:58 +05'30'

**( प्रतिभा पाटील )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई - ३२
२. मा.राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई - ३२
३. अपर मुख्य सचिव (कृषि) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई-३२
४. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
५. संचालक (कृषि प्रक्रिया व नियोजन), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
६. मुख्य सांख्यिक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
७. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
८. सहाय्यक संचालक (लेखा), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
९. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
१०. महालेखापाल, महाराष्ट्र -१/२, (लेखा परिक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर
११. वित्त विभाग (व्यय-१/ अर्थ-१३), मंत्रालय, मुंबई- ३२
१२. उप सचिव (११-अे/२-अे), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक
१३. कक्ष अधिकारी (२-अे), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई -३२
१४. विभागीय व्यवस्थापक, भारतीय कृषि विमा कंपनी, लोक चेंबर्स, मरोल मरोशी नाका, मरोल. अंधेरी(पूर्व), मुंबई - ४०० ०५९.
१५. विभागीय व्यवस्थापक, आयसीआयसीआय लोंबार्ड जनरल इंशुरन्स कं.लि., आयसीआयसीआय हाऊस, ४१४, वीर सावरकर मार्ग, सिध्दीविनायक मंदिराजवळ, प्रभादेवी, मुंबई- ४०० ०२५.
१६. विभागीय व्यवस्थापक, एचडीएफसी इगों इंन्शुरन्स कं. लि. डी-१०३ तीसरा मजला ईटन बिझनेस, डिस्ट्रीक्ट एल.एस.बी. मार्ग भांडूप (पश्चिम), मुंबई- ४०००७८
१७. निवड नस्ती (कार्यासन ११-अे)